लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील संगणकीकरण प्रकल्पातंर्गत Point of Sale Device (PoS) बसविण्यात आलेली रास्तभाव दुकाने Go Live करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः साविबा २०१७/प्र.क्र. ८२ /सं.क.

मादाम कामा मार्ग, राजगुरू हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१७

वाचा :-

१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक:साविबा २०१५/प्र.क्र.२०/सं.क. दि. १८ मे, २०१६

२) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक:साविबा २०१७/प्र.क्र.८२/सं.क. दि. २१ सप्टेंबर,२०१७

प्रस्तावना :-

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानातील शिधावस्तुचे वितरण करतांना लाभार्थ्यांची बायोमॅट्रीक ओळख पटवून Point of Sale Device (PoS) द्वारे शिधावस्तू वितरण करण्याचा निर्णय दि.१८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील संगणकीकरण प्रकल्पातंर्गत Point of Sale Device (PoS) बसविण्यात आलेली रास्तभाव दुकाने Go Live करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

२. रास्तभाव दुकानांत PoS उपकरणे बसविण्यासाठी राज्यातील रास्तभाव दुकानांची तीन गटात विभागणी करण्यात आली व पारदर्शक पध्दतीने निविदा प्रकिया राबवून प्रत्येक गटांकरिता System Integrator यांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या System Integrator यांचा तपशील खालीलप्रमाणे-

गट	System Integrator
गट १- (कोकण-नाशिक विभाग व मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र)	M/s Oasys Cybernetics Pvt. Ltd.
गट २- (पुणे-औरंगाबाद विभाग)	M/s Linkwell Telesystems Pvt. Ltd.
गट ३- (नागपूर- अमरावती विभाग)	M/s Integra Micro System (P) Ltd.

३. System Integrator सोबत Master Service Agreement (MSA) करण्यात आले असून रास्तभाव दुकानात System Integrator मार्फत PoS उपकरणे बसविण्यात आली आहेत.

४. Request for Proposal (RFP) मधील तरतूदीनुसार सर्व रास्तभाव दुकानांतून किमान १० Transactions होणे Go Live करिता आवश्यक आहे. M/s Integra Micro System (P) Ltd. व M/s Linkwell Telesystems Pvt. Ltd. या System Integrator द्वारे त्यांना नियुक्त केलेल्या गटातील रास्तभाव दुकानांतून केलेल्या Transactions ची सरासरी १० पेक्षा जास्त आहे. तसेच ९९ टक्क्यांपेक्षा जास्त PoS उपकरणे Live करण्यात आली आहेत. त्यामुळे सदर गटांतील रास्तभाव दुकाने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासून Go Live घोषित करण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००५१५०२४४३३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2017.10.05 14:53:02 +05'30'

(स.श्री.सुपे)
उपसचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
५) मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
९) सर्व प्रशासकीय विभागाचे सचिव,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१५) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
१६) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,

१७) उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
१८) सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
२०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला,विधान भवन,मुंबई. (१०प्रती)
२१) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
२२) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य
२३) सर्व विरोधी पक्षनेते.
२४) निवड नस्ती (सं.क.)